**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, यांचे कार्यालय**
"**वनभवन**", रामगिरी रोड, सिव्हील लाईन, नागपूर-४४० ००१

क्र.अप्रमुवसं(संरक्षण)/कक्ष-१८/प्र.क्र.२७/२०२०-२१/**३९५**, दिनांक: **३०** डिसेंबर २०२०

## परिपत्रक

**विषय: नियतक्षेत्रे तपासणी करतांना अवलंबवायची कार्यपध्दती.**

**संदर्भ:** महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.टिआरएस-०४/२०१४/प्रक्र.७२/फ-६, दि.१३ ऑगस्ट, २०१४

संदर्भिय शासन निर्णयात वनसंरक्षणाचे मापदंड विहित करण्यात आले आहे. त्यात, इतर बाबीं व्यतिरिक्त परिच्छेद २ मध्ये नियतक्षेत्र तपासणी संदर्भात पुढीलप्रमाणे निर्देश आहेत-

*२. **नियतक्षेत्रे तपासणी :** उपवनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी आणि उप विभागीय वन अधिकारी हे त्यांचे अधिनस्त क्षेत्रासाठी नियतक्षेत्रे तपासणीचा वार्षिक कार्यक्रम निर्धारीत करतील. सदर कार्यक्रम निर्धारीत करतांना **प्रत्येक ६ महिन्यात विभागातील/उपविभागातील सर्व नियतक्षेत्रांची तपासणी पूर्ण होईल,** याबाबतची दक्षता उक्त अधिका-यांनी घ्यावी. वनपरिक्षेत्र अधिकारी हे संपूर्ण वर्षात त्यांचे अधिनस्त शक्यतो सर्व नियतक्षेत्रांची तपासणी करतील. तथापि, त्यांनी १ महिन्यात कमीत कमी १ नियतक्षेत्राची तपासणी न चुकता करावी. नियतक्षेत्रांची संख्या जास्त असल्यामुळे वनपरिक्षेत्र अधिकारी यांना संपूर्ण वर्षात त्यांचे अधिनस्त नियतक्षेत्र तपासणी करणे शक्य होत नसेल तर त्याची भरपाई वनक्षेत्रपाल/सहाय्यक वनसंरक्षक - फिरते पथक यांचे मार्फत करण्यात येईल.*

*सहाय्यक वनसंरक्षक प्रत्येक महिन्यात वनपाल किंवा वनपरिक्षेत्र अधिका-यांनी तपासलेल्या नियतक्षेत्रातील गंभीर बाबी आढळून आलेल्या क्षेत्रांची पुन:तपासणी करतील. याव्यतिरीक्त विभागीय वन अधिकारी (दक्षता) हे त्यांचे पथकामार्फत Random पध्दतीने नियतक्षेत्र तपासणी करतील. नियतक्षेत्र तपासणी करतांना भारतीय वन अधिनियम १९२७, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२, वन (संवर्धन) अधिनियम १९८० व अनुषंगिक नियमांखाली घडलेल्या गुन्हयांची नोंद/दखल घेतील. अनुसूचित जमाती तथा इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ या अधिनियमाखाली मान्य व अमान्य तसेच अपील दाव्यासंदर्भातसुध्दा आढावा घेतील. वनाच्या हद्दी, खुणा, बुरुज, इत्यादी बरोबर आहेत का, याची पाहणी करतील. वनरक्षकाचा अभिलेख बरोबर आहे का हे पाहतील. त्यांचेकडील जप्त मुद्देमाल-पुस्तिका, आदेश पुस्तिका, बीट नकाशा, टोपोशीट, दैनंदिनी, गणवेश साहित्य, जीपीएस, मोबाईल फोन, PDA व इतर शासकीय साहित्य सुस्थितीत असल्याबाबत नोंद घेतील, वनरक्षक व वनपाल हे G.P.S. व P.D.A. या यंत्राचा योग्य प्रकारे वापर करतात का याची शहानिशा करावी तसेच वनरक्षक मुख्यालयात राहतो का याची माहिती घेतील. (वनरक्षकाचे अभिलेखाची एक चेक लिस्ट तयार करण्यात यावी म्हणजे तपासणी काम सुकर होईल) वनरक्षकाचे वार्षिक गोपनीय अहवाल लिहिताना तपासणी अहवालाची मदत घेतली जाईल. ताब्यातील जप्त मुद्देमाल व त्याची नोंदवही यांचा ताळमेळ तपासतील.*

**२.०** नियतक्षेत्र तपासणी बाबत राज्यस्तरावर एकसुत्रता रहावी व नियतक्षेत्र तपासणी अधिक प्रभावीपणे व्हावी, या दृष्टीने दि. १ जानेवारी २०२१ पासून नियतक्षेत्र तपासणीबाबत अवलंबवायची कार्यपध्दती बाबत पुढील निर्देश देण्यात येत आहेत.

२.१ **नियतक्षेत्र तपासणी कोणी करायचे?** : नियतक्षेत्राचे संबंधित वनपाल, वनपरिक्षेत्र अधिकारी व सहाय्यक वनसंरक्षक, तसेच वनक्षेत्रपाल (फिरते पथक) आणि विभागीय वन अधिकारी (दक्षता) यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात नियतक्षेत्र तपासणी करणे अभिप्रेत आहे.

२.२ संदर्भिय शासन निर्णयातील परिच्छेद २ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे नियतक्षेत्र तपासणीचा वार्षिक कार्यक्रमानुसार, संबंधित वनपालाने ज्या महिन्यात तपासणी केली आहे, त्याच्या लगतच्या पुढील महिन्यात प्रादेशिक वनक्षेत्रपाल अथवा वनक्षेत्रपाल (फिरते पथक) तपासणी करतील, या दृष्टिने कार्यक्रम आखावा. त्याचप्रमाणे प्रादेशिक वनक्षेत्रपाल किंवा वनक्षेत्रपाल (फिरते पथक) यांनी तपासणी केल्यानंतर पुढिल महिन्यात संबंधित सहाय्यक वनसंरक्षक तसेच विभागीय वन अधिकारी (दक्षता) यांचेकडून तपासणी होईल, याची दक्षता घ्यावी. अश्याप्रकारे तपासणी दरम्यान कनिष्ठांकडून काही उणीवा राहून गेल्या असल्यास, त्याबाबत वरिष्ठांकडून सुधारणा होणे अभिप्रेत राहील.

२.३ नियतक्षेत्र तपासणी अधिकारी यांनी तपासणीचे तारखेबद्दल संबंधित बिट वनरक्षक आणि संबंधित वनपाल व यथास्थितीत वनक्षेत्रपाल यांना पुर्व कल्पना द्यावी.

२.४ नियतक्षेत्र तपासणीच्या सुरवातीस, नियतक्षेत्र तपासणी अधिकारी यांनी संबंधित कनिष्ठ वनअधिका-यांचे प्रथम गुन्हा नोंदवही (POR Book) ताब्यात घेवून, त्यात सर्वात शेवटी नोंदविण्यात आलेल्या प्रथम अहवालावर स्वाक्षरी करावी.

२.५ तपासणी सुरु करण्यापूर्वी, तपासणी अधिकारी यांनी संबंधित कनिष्ठ वनअधिका-यांकडील जप्ती हॅमर ताब्यात द्यावा आणि तपासणी होईपर्यंत स्वत:च्या ताब्यात ठेवावा.

२.६ नियतक्षेत्र तपासणी अधिकारी यांनी संबंधित कनिष्ठ वनअधिका-यांचा हॅमर न वापरता स्वत:चा हॅमर वापरावा. विभागीय वन अधिकारी (दक्षता) यांनी संबंधित वनक्षेत्रपाल (फिरते पथक) यांचेकडील हॅमर वापरावा.

२.७ तपासणी दरम्यान मिळालेल्या बुडांवर पेंटने अनुक्रमांक दयावेत व त्यावर नियतक्षेत्र तपासणी अधिकारी यांनी त्यांचा स्वत:चा हॅमर उमटवावा. नियतक्षेत्र तपासणीत आढळलेल्या थूट, बिट वनरक्षकाकडील थूट नोंदवहीत नोंदविण्यात आलेल्या अखेरच्या थूटाच्या पुढील क्रमवारीत नोंदविण्यात येतील.

२.८ नियतक्षेत्र तपासणी अधिकारी यांनी तपासणी दरम्यान मिळालेल्या बुडाची नोंद बिट वनरक्षकाकडे असलेल्या थूट नोंदवहीत घेतल्याअंती त्यात स्वाक्षरी करावी. दिनांक 01 जानेवारी पासून नवीन थूट नोंदवही ठेउन कॅलेंडर वर्षानुसार थूटांची नोंद घेणेत यावे.

२.९ नियतक्षेत्र तपासणी अधिकारी यांनी नियतक्षेत्र तपासणी झाल्यावर वनसंरक्षणाच्या दृष्टीने संबंधित कनिष्ठ वन अधिका-यांस लेखी स्वरुपात सुचना दयाव्यात व त्यांचे हॅमर व पीओआर बुक त्यास परत करावे.

२.१० तपासणी दरम्यान तपासणी अधिकारी यांनी अवैध वृक्षतोडी बरोबरच अवैध चराई, अतिक्रमण, वनवणवा, अवैध खोदकाम, सिमाकंनाची अवस्था, वन्यप्राण्यांचे अधिवासास इजा इत्यादी बाबतची नोंद घ्यावी. अश्या आढळून आलेल्या बाबींबाबत संबंधित कनिष्ठ वनअधिका-यांकडे पूर्वी वनगुन्हे नोंदविण्यात आलेले नसल्यास, त्याबाबतचे गुन्हे नोंदवावेत. अशा गुन्हयांची नोंद, संबंधित बीट वनरक्षकाकडे असलेल्या प्रथम गुन्हा नोंदवहीतच (POR Book) करण्यात यावी. तपासावयाच्या सर्वसामान्य बाबी खालील प्रमाणे राहतील.

१) भारतीय वन अधिनियम, १९२७, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२, वन (संवर्धन) अधिनियम, १९८० व अनुषंगिक नियमाविरुद्ध घडलेले गुन्हयांची नोंद घेणे

२) अवैध वृक्षतोड

३) वादळाने उनमळून पडलेल्या वृक्षांची माहिती

४) वन्यप्राणी शिकार अथवा त्यांचे अधिवासास हानी

५) अवैध चराई

६) अवैध बांबु कटाई

७) अवैध खनिज उत्खनन (माती, रेती, मुरुम, दगड, इत्यादी)

८) कांदळ वनात कचरा, मलबा, रॅबिटचा भराव (डेब्रीस डम्पिंग) व भरती/ओहटीचे प्रवाह अडविणे

९) **नियतक्षेत्र सिमा** - सिमांकनाची अवस्था - उदा. दगडी बुरुज (ढासळलेले/व्यवस्थित), सिमेंटचे पोल (व्यवस्थित/तुटलेले), गुरे प्रतिबंधक चर असल्यास त्याची स्थिती (बुजलेले/बुजविलेले/बरोबर) व इतर

१०) आग प्रतिबंधक उपाययोजना व आगरेषांची अवस्था (Maintained/Non-Maintained)

११) **अतिक्रमण** - अतिक्रमणाखालील क्षेत्र व त्याचे स्वरुप (शेती/बांधकाम - कच्चे/पक्के व इतर)

१२) **वनवणवा स्थिती** - जळालेले क्षेत्र, अंदाजित कालावधी, जारी वनगुन्हा व दिनांक

१३) **वन्यप्राणी अस्तित्व** - प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष, खुणा/पाऊलखुणा/विष्ठा, इत्यादी

१४) **नियतक्षेत्र मधील रोपवने** - रोपवन क्षेत्र व रोपवनाची सर्वसामान्य अवस्था

१५) **पाणवठे अस्तित्व** - नैसर्गिक पानवठे व सिमेंट बांध, मातीचे बांध, वनतळे, पाझर तलाव (मासेमारीस परवानगी असलेले/नसलेले) यांची संख्या व त्यांची स्थिती चांगले/क्षतिग्रस्त, पाणी असलेले/कोरडे

१६) नियतक्षेत्रातून विदयुत वाहिनी गेलेली आहे / नाही (उच्चदाब / इतर)

१७) नियतक्षेत्रात आढळणा-या प्रजाती - फळ, वृक्ष प्रजाती

१८) नियतक्षेत्रात संरक्षण कुटी (Protection Hut) तसेच बिनतारी यंत्रणा असल्यास त्याची सद्यास्थिती व रखरखाव

२.११ बिट वनरक्षकाने पूर्वी जप्त केलेल्या मालाची नोंदवही व प्रत्यक्षात त्याच्या ताब्यात असलेला माल तपासणी अधिकारी यांनी तपासावे आणि वनरक्षकाच्या ताब्यात असलेल्या मालात तफावत आढळल्यास, त्याची नोंद करावी. तसेच शासकीय आगारात वाहतुक न झालेल्या मालाबाबत तपासणी अधिकारी यांनी संबंधित कनिष्ठ वन अधिका-यास सुचना द्यावी.

२.१२ वनरक्षकाकडे दप्तर, हॅमर, थुट नोंदवही, प्रथम गुन्हा अहवाल नोंदवही, आदेश पुस्तिका, मुद्देमाल पुस्तिका, नियतक्षेत्र नकाशा, गाव नकाशा, टोपोशिट, दैनंदिनी, गणवेश इत्यादी साहित्य राहील, उपवनसंरक्षक याची सुनिश्चिती करतील. सदर साहित्य सुस्थितीत असल्याबाबत तपासणी अधिकारी यांनी खात्री करावी.

२.१३ अनुसूचित जमाती तथा इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ या अधिनियमाखाली मान्य व अमान्य तसेच अपील दाव्या संदर्भात आढावा घेवून नामंजूर वनहक्क क्षेत्र वन विभागाच्या ताब्यात घेण्यात आले किंवा नाही, याची खात्री करावी व तशी नोंद घ्यावी.

२.१४ नियतक्षेत्र तपासणी अहवाल सोबतच्या प्रपत्रात, तपासणीच्या ७ दिवसाच्या आत, लगतच्या वरिष्ठ अधिका-यांकडे सादर होईल, याची सुनिश्चिती करावी.

२.१४.१ नियतक्षेत्र तपासणी बाबतची सर्वसाधारण माहिती **प्रपत्र-१** मध्ये द्यावे.

२.१४.२ तपासणी दरम्यान आढळलेल्या गुन्हयांबाबत तपशील **प्रपत्र-२** मध्ये द्यावे.

२.१४.३ तपासणी दरम्यान आढळलेल्या अतिक्रमणाबाबत तपशील **प्रपत्र-३** मध्ये द्यावे.

२.१४.४ चतु:सिमा व बुरुज बाबतचा तपासणी अहवाल **प्रपत्र-४** मध्ये द्यावे.

३.० नियतक्षेत्र तपासणी अहवालाचे विश्लेषण व अनुषंगिक कार्यवाही बाबत संदर्भिय शासन निर्णयातील परिच्छेद ३ मध्ये पुढीलप्रमाणे निर्देश आहेत.

*३. **नियतक्षेत्र तपासणी अहवालाचे विश्लेषण व आनुषंगिक कार्यवाही:** प्रत्येक तिमाहीनंतर उपवनसंरक्षक /विभागीय वन अधिकारी/उप विभागीय वन अधिकारी यांनी विशेष सत्र आयोजित करुन मागील ३ महिन्यात करण्यात आलेल्या नियतक्षेत्र तपासणी अहवालाचे विश्लेषण करावे. या सत्रात विभागातील सर्व सहाय्यक वनसंरक्षक, वन परिक्षेत्र अधिकारी, फिरते पथकाचे अधिकारी, संबंधित वनपाल व वनरक्षक उपस्थित राहतील. नियतक्षेत्र तपासणीत आढळून आलेल्या बाबींचा विचार करुन पुढे घ्यावयाची दक्षता व आनुषंगिक कार्यवाही बाबत अंमल कसा करता येईल या बाबत उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी/ उप विभागीय वन अधिकारी यांनी विशिष्ट सूचना द्याव्यात.*

**३.१** सबब नियतक्षेत्र तपासणी अहवालाचा वरील प्रमाणे विश्लेषण करणेत यावे तसेच त्या आधारावर वनसंरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी.

४.० सदर परिपत्रक प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

**सहपत्र : वरीलप्रमाणे**

(संजीव गौड)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण)

**प्रति,**

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व)
मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक (प्रा) (सर्व)
महाव्यवस्थापक, महाराष्ट्र वनविकास महामंडळ (सर्व)
वनसंरक्षक व क्षेत्र संचालक / वनसंरक्षक व संचालक, वन्यजीव (सर्व)
उपवनसंरक्षक (प्रा) / उप विभागीय वन अधिकारी (प्रा) (सर्व)
उपसंचालक, व्याघ्र राखीव (सर्व)
विभागीय वन अधिकारी (प्रा) व (वन्यजीव) सर्व
विभागीय व्यवस्थापक, वनविकास महामंडळ (सर्व)
सहाय्यक वनसंरक्षक (सर्व)
वनपरिक्षेत्र अधिकारी (सर्व)

**प्रतिलिपी,**
प्रधान सचिव (वने), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व)
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वनविकास महामंडळ, नागपूर

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) कडील परिपत्रक क्रमांक कक्ष-१८/दक्षता/प्र.क्र.२७/२०२०-२१/**३९५**, दिनांक ३० डिसेंबर २०२०

**प्रपत्र-१**

**नियतक्षेत्र तपासणी सर्वसाधारण माहिती (परिच्छेद २.१४.१ नूसार)**

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वनविभाग / वनपरिक्षेत्र / परिमंडळ : | | | | | | | | |
| २ | नियतक्षेत्राचे नांव : | | | | | | | | |
| ३ | नियतक्षेत्र तपासणी करणा-या अधिका-यांचे नांव व हुद्दा | | | | | | | | |
| ४ | तपासणीचा कालावधी | | | | | | | | |
| ५ | नियतक्षेत्र थूट नोंदवहीत नोंदविलेले अखेरचे थूट क्रमांक | | | | | | | | |
| ६ | तपासणीतील अवैध वृक्ष तोडीचा तपशील | | | | | | | | |
| ६.१ | गोलाई वर्ग नुसार थुट संख्या | | गोलाई वर्ग (से.मी.) | | | | | | |
| | | | १५-३० | ३१-४५ | ४६-६० | ६१-७५ | ७६-९० | ९१-१०५ | १०५ वरील |
| | A. | साग थुट : | | | | | | | |
| | B. | इतर थुट : | | | | | | | |
| | (A+B): | एकुण थुट | | | | | | | |
| ६.२ | अवैध वृक्षतोड (फॉर्म फॅक्टर प्रमाणे अपेक्षित माल) | | | | साग | इतर | एकुण | निव्वळ नुकसानी | |
| | घ.मी. (फॉर्म फॅक्टर प्रमाणे) : | | | | (C) | (D) | (E)=(C+D) | | |
| | किंमत रु. : | | | | (F) | (G) | (H)+(F+G) | | |
| ६.३ | बुडावरील जप्त वनउपज | | | जात | नग | घ.मी. | किंमत रु. | घ.मी. | किंमत रु. |
| | | | | साग | | (I) | (J) | (C-I) | (F-J) |
| | | | | इतर | | (K) | (L) | (D-K) | (G-L) |
| | | | | एकुण | | (M) | (N) | (E-M) | (H-N) |
| ७ | कांदळ वनात कचरा, मलबा, रॅबिटचा भराव (डेब्रीस डम्पिंग) व भरती/ओहटीचे प्रवाह अडविणे | | | | आहे/नाही | | | | |
| ८ | सिमांकनाची अवस्था | | | | सुस्थीतीत आहे/नाही | | | | |
| ९ | हद्दीच्या खुना | | | | सुस्थीतीत आहे / नाही | | | | |
| १० | पंचवार्षिक सिमांकनाच्या वेळी उभारलेले बुरुज | | | | सुस्थीतीत आहे/नाही | | | | |
| ११ | बिट पुस्तीका | | | | आहे/नाही | | | | |
| १२ | आदेश पुस्तीका | | | | आहे/नाही | | | | |
| १३ | गणवेश साहित्य | | | | आहे/नाही | | | | |
| १४ | बिट नकाशा | टोपोशिट | गाव नकाशा | जी.पी.एस. | जी.पी.एस. चा वापर | स्मार्टफोन पी.डी.अे. | स्मार्टफोन पी.डी.अे. चा वापर | स्मार्टफोन पी.डी.अे. स्थिती | बिनतारी यंत्रणा |
| | आहे/नाही | आहे/नाही | आहे/नाही | आहे/नाही | आहे/नाही | आहे/नाही | आहे/नाही | चालू/बंद | चालू/बंद |
| १५ | वनरक्षक मुख्यालयात राहतो/ राहते | | | | होय/नाही | (निष्कर्षाबाबत अभिप्राय *नमूद करणे)* | | | |
| १६ | वनरक्षक वनक्षेत्रात गस्ती करतो/करते | | | | होय/नाही | (निष्कर्षाबाबत अभिप्राय *नमूद करणे)* | | | |
| १७ | नियतक्षेत्र वणव्यामुळे प्रभावित दिसून आल्यास ? | | | | असल्यास, प्रभावित क्षेत्र ____________________ | | | | |
| १८ | नियतक्षेत्रात संरक्षण कुटी ची सद्यास्थिती व रखरखाव | | | | | | | | |
| १९ | मागील एक वर्षात वनअधिका-यावरील हल्ले/संघर्षाची प्रकरणे घडली असल्यास त्याची माहिती खाली नमूद करणे | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| २० | सर्वसाधारण अभिप्राय | | | | | | | | |

स्थळ :

दिनांक :

नियतक्षेत्र तपासणी अधिका-याचे नाव, पदनाम व स्वाक्षरी

## प्रपत्र - २

## नियतक्षेत्र तपासणी दरम्यान आढळलेल्या गुन्ह्यांबाबत तपशील

(परिपत्रकातील परिच्छेद क्र. २.१४.२ नूसार)

| अ.क्र. | गुन्हा क्रमांक व दिनांक | तपशील |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ व पुढे | | |

नियतक्षेत्र तपासणी अधिका-याचे नाव, पदनाम व स्वाक्षरी

---

## प्रपत्र - ३

## नियतक्षेत्रातील आढळून आलेल्या अतिक्रमणाचा गोषवारा

(परिपत्रकातील परिच्छेद क्र. २.१४.३ नूसार)

| अ.क्र. | कक्ष क्रमांक / सर्व्हे क्र. | क्षेत्र हेक्टर | अतिक्रमण क्षेत्र हेक्टर | अतिक्रमणाबाबत करणेत आलेली/करण्यात येणारी कार्यवाही/कारवाई |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ५ | ६ |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ व पुढे | | | | |
| | | एकुण: | | |

नियतक्षेत्र तपासणी अधिका-याचे नाव, पदनाम व स्वाक्षरी

---

## प्रपत्र - ४

## नियतक्षेत्राच्या चतु:सिमा व बुरज

(परिपत्रकातील परिच्छेद क्र. २.१४.४ नूसार)

वन खंडाचे सिमाकंन अद्यावत आहे / नाही

| बुरुज प्रकार | वर्ग - ०१ | संख्या | वर्ग - ०२ | संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| दगडी | | | | | |
| सिमेंट | | | | | |

वन खंडाची सिमा/खुणा बरोबर / चुकीचे आहे

नियतक्षेत्र तपासणी अधिका-याचे नाव, पदनाम व स्वाक्षरी